Impact Factor - 6.261

ISSN - 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

January - 2019

SPECIAL ISSUE- 82 (A)

# पटकथा लेखन : स्वरुप आणि चिकित्सा



अतिथी संपादक :

**डॉ. इंद्रजित जाधव**

प्राचार्य,

बी.डी. काळे महाविद्यालय, घोडेगाव

ता. आंबेगाव, जि. पुणे

विशेषांक संपादक :

**डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर**

मराठी विभाग प्रमुख

बी.डी. काळे महाविद्यालय, घोडेगाव

ता. आंबेगाव, जि. पुणे

विशेषांक सहसंपादक :

**प्रा. पोपट माने, डॉ. पुरुषोत्तम काळे**

मुख्य संपादक :

**डॉ. धनराज धनगर**

This Journal is indexed in :
- UGC Approved Journal
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

Principal
Tuljaram Chaturchand College
Baramati

SWATIDHAN PUBLICATIONS

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF ) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 82 (A) : पटकथा लेखन : स्वरूप आणि चिकित्सा
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
January-2019

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | लेखाचे शीर्षक | लेखक/लेखिका | पृ.क्र. |
|---|---|---|---|
| 1 | A legendary Films and Film-Makers | Dr. Amina Khatun | 05 |
| 2 | पटकथा लेखन- स्वरूप आणि चिकित्सा | श्रीनिवास भणगे | 08 |
| 3 | चित्रपट सृष्टीला दृगोच्चर करणारी पटकथा | डॉ. तुकाराम रोंगटे | 13 |
| 4 | तमिळ चित्रपट : एक दृष्टीक्षेप | डॉ. ताहेर पठाण | 17 |
| 5 | कन्नड मराठी पटकथा आणि वास्तव | डॉ. श्रीपती रायमाने | 21 |
| 6 | पटकथा लेखन :एक परिचय | डॉ.प्रमोद भगवान पडवळ | 24 |
| 7 | ठाकर जीवनावरील पटकथा लेखन | डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर | 31 |
| 8 | साहित्य आणि चित्रपट | डॉ. भास्कर ढोके | 34 |
| 9 | चित्रपट माध्यम आणि आदिवासी सामाज वास्तव | डॉ. वैजनाथ अनमूलवाड | 40 |
| 10 | पटकथा लेखन प्रक्रिया | सुरेश मेहेर | 45 |
| 11 | कथा ते पटकथा | डॉ. सुनील खामगळ | 49 |
| 12 | ऐतिहासिक कादंबरी आणि पटकथा लेखन | प्रा.चांगुणा कदम | 57 |
| 13 | माहितीपटाची संकल्पना आणि स्वरूप | डॉ. महेबूब सय्यद | 59 |
| 14 | माहितीपट निर्मितीचे तांत्रिक स्वरूप | डॉ. नवनाथ येठेकर | 65 |
| 15 | पटकथा लेखनप्रक्रिया | डॉ. राजेंद्र खंदारे | 69 |
| 16 | साहित्य आणि चित्रपट | डॉ. अनिल बांगर | 73 |
| 17 | पटकथा लेखन स्वरूप | डॉ. वंदना नढे | 78 |
| 18 | भारतीय प्रागतिक चित्रपट विशेष संदर्भ : 'काला' | मदन जाधव | 80 |
| 19 | पटकथालेखन : संकल्पना आणि स्वरूप | डॉ. प्रमोद धिवार | 83 |
| 20 | नाटक, पटकथा : शैली आणि तंत्र | प्रा. प्रमोद पवार | 87 |
| 21 | पटकथा लेखन आणि नाट्यलेखन | प्रा.विकास बहुले | 91 |
| 22 | पटकथा लेखन- स्वरूप आणि चिकित्सा | प्रा. शुभांगी बारवकर | 96 |
| 23 | लघुपट,माहितीपट आणि चित्रपट (सिनेमा) पटकथा लेखन- स्वरूप आणि चिकित्सा | प्रा. अपूर्वा बेतकेकर | 98 |
| 24 | पटकथेतील व्यक्तीरेखाटन आणि संवाद स्वरूप विशेष | प्रा.अरविंद जाधव | 102 |
| 25 | पटकथा लेखन आणि नाट्य लेखन यातील साम्य-भेद | डॉ. एम. एम. बागुल | 106 |
| 26 | पटकथा लेखनाचे तंत्र | डॉ. हनुमंत भवारी | 110 |
| 27 | पटकथा लेखन प्रक्रिया | सायली जगताप | 113 |
| 28 | चित्रपट, लघुपट, माहितीपट | डॉ.उज्ज्वला भोर | 118 |
| 29 | पटकथा लेखन- एक कला | डॉ. केतकी भोसले | 122 |
| 30 | चित्रपटाच्या निर्मितीप्रक्रियेमध्ये कॅमेऱ्याचे महत्त्व | डॉ.बाळासाहेब चव्हाण | 125 |
| 31 | पटकथा लेखनाचे तंत्र | प्रा.तुकाराम चव्हाण | 132 |
| 32 | पटकथा आणि इतर कला | प्रा.अमोगसिद्ध चेडके | 135 |
| 33 | मराठी चित्रपटसृष्टीची वाटचाल | डॉ.नारायण चौरे | 138 |
| 34 | पटकथा लेखन : संकल्पना व स्वरूप | डॉ.मधुकर वैकरे | 144 |
| 35 | साहित्यकृती व पारितोषिक प्राप्त चित्रपट | डॉ.सौ.मंगल डोंगरे | 147 |
| 36 | बाल नायकप्रधान श्यामची आई ते नाळ व्हाया टिंग्या : पटकथा लेखन | डॉ.दत्तात्रय डुंबरे | 151 |




TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI
Principal
Tuljaram Chaturchand College
Baramati

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 82 (A) : पटकथा लेखन : स्वरूप आणि चिकित्सा
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
January-2019

# कथा ते पटकथा

डॉ. सुनील खामगळ
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय,
बारामती, जि. पुणे
मो. ८८०५४३८१८५

**प्रस्तावना :**

अलीकडच्या काळात सिनेमा, नाटक असा क्षेत्रात आपले करिअर करण्याच्या प्रयत्नात अनेक तरूण कार्यरत आहेत. सिनेमाची कथा लिहिण्यापासून ते त्या सिनेमात भूमिका करणे, संगीत, कॅमेरा, लाईट अशा विविधांगी भूमिका करून या क्षेत्रात नावलौकिक करण्याची संख्या दिवसेंदिवस खूप झपाटयाने वाढत आहे. लघुचित्रपटाच्या निर्मितीचे फॅड खूप मोठया प्रमाणात आहे. काही तरूण यात यशस्वीही झालेले दिसतात. परंतु हे यश हे चित्रपटाच्या कथेवरच अवलंबून असते. एखादा दर्जेदार सिनेमा तयार करायचा असेल तर त्यासाठी तेवढीच दर्जेदार कथा असणे आवश्यक आहे. केवळ दर्जेदार कथा असून चालणार नाही तर त्या कथेचे तितक्याच दर्जेदारपणे पटकथेत रूपांतर करता आले पाहिजे. चित्रपटाचे यश पटकथेवरच अवलंबून असते.

पटकथा म्हणजे तो चित्रपट कसा असणार? किंवा कसा दिसणार? हे लिहून ठेवणे होय. पटकथा ही अनेक पद्धतीने लिहिली जाते. म्हणजे चित्र काढूनही पटकथा लिहिली जाते. उदा. 'अजिंठा' या चित्रपटाकडे पाहता येईल. चित्राप्रमाणेच प्रसंग लिहून ही पटकथा लिहिली जाते. पटकथेवरच त्या सिनेमाच यश अवलंबून असते. असे असले तरी पटकथेच्या आधी कथा येत असते. एखाद्या साहित्यिकाची गाजलेली एखादी कलाकृतीवरून ही पटकथा लिहिली जाते. सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, ऐतिहासिक घटना, प्रसंग अशावर पटकथा लिहिले जाते.

चित्रपटासाठी ज्या कथेची निवड केली जाते. त्या कथेचे पटकथेत रूपांतर करण्याची तयारी सुरू होते. कथेचे मूळ बीज लक्षात ठेवून पटकथेचे एक-एक प्रसंग लिहिले जातात. पटकथेमध्ये विविध पात्रे, त्याचा स्वभाव, परिसर याचाही बारकाईने विचार करून मांडणी करावी लागते. कथा ही सरळ असते. लेखकाला जे मांडायचे असते ते त्यांनी मांडलेले असते. त्यामुळे अशा सर्वच प्रसंगाला पटकथेमध्ये मांडताना काही मर्यादा येतात. मर्यादा आल्या असल्यातरी मूळ कलाकृतीत फारसा बदल होता कामा नये. अन्यथा पटकथा विस्कळीत होवू शकते का? कशासाठी? कशामुळे? या सर्व गोष्टीकडे पटकथाकाराला लक्ष द्यावे लागते.

पटकथेमध्ये प्रसंगा/दृश्याच्या मांडणीला अनन्य साधारण महत्त्व असते. प्रसंगाची मांडणी प्रभावीपणे करावी लागते. पटकथेमध्ये अनेक प्रसंग/दृश्य लिहावे लागतात. दृश्याला क्रमांक दिले तर ते अधिक सोयीचे होते. दृश्यानुसार चित्रिकरण केले जाते. दृश्य लिहित असताना प्रसंगांची, दृश्यांची गुंफन व्यवस्थित होणे महत्त्वाचे आहे. पहिल्या प्रसंगा/दृश्यानंतर जेव्हा दुसरे प्रसंग/दृश्य येत असते. तेव्हा त्यांचा एकमेकांशी असणारा संबंधही व्यवस्थितरित्या जोडता आला पाहिजे. एखादा प्रसंग लिहित असताना केवळ संवाद लिहून चालणार नाही तर त्या संवादाच्या वेळीची परिस्थिती, प्रदेश, त्या प्रदेशातील वातावरण वेळ या सर्वांना महत्त्व असते. संवाद येताच क्षणी वरील सर्व गोष्टी त्यामध्ये येणे आवश्यक असते.

यासाठी आपण 'गणाची पिपाणी' या माझ्या कथेचे प्रत्यक्षात पटकथेमध्ये कसे रूपांतर केले आहे ते पाहता येईल.

**कथा -**

**गणाची पिपाणी**

खामगळवाडी साधारणतः शंभरेक उंबऱ्याची वाडी. डोंगराच्या कुशीत वसलेली पावसाळयात फुलून येणारी अन उन्हाळयात कोमजून जाणारी. पावसाच्या भरवशावर जगणारी, धरचं करता-करता दुसऱ्याच्या शेतात मजूर म्हणून राबणारी. काम नसलं की नुसती बसून राहायची. दिवसभर चिंचेच्या पारावर पत्त्याच्या डावात रमायची, संध्याकाळी त्यातली काही मारूतीच्या देवळात पसरायची, गप्पांचा फड रात्रीच्या बारा वाजेपर्यंत चालायचा, बायकांना काम जास्त असायचं त्या आपल्या नवऱ्यावर सतत खेकसायच्या 'कामबिम बगा की वाईच' म्हणायच्या.

सकू तर जाम वैतागून जायची, नवऱ्याला गणाला म्हणायची, 'देवानं दोन पोरं दिल्यात नुसतं बसून ऱ्हाता. कुठं बिटं कामबिम बगा की, यावर गणा म्हणायचा, ''मिरगाचा पाऊस [illegible] बिगार काम-नाय कुठं जावू?''



BARAMATI
Principal
Tuljaram Chaturchand College
Baramati

"कुठं बी जावा, काय बी करा पण कामधंदा बगा." सकू म्हणायची. गणा विचार पण करायचा. दुसऱ्याच्या शेतात मजुरी करायचा. आलेलं पैसं सकूला द्यायचा. पण आता कामच नव्हतं.

सकूच्या असल्या रोजच्या बोलण्यानं गणा वैतागला होता. म्हणून कधुरं पडलं की लोकांची रानं धुंडाळायला लागला. अन काय-बाय घेवून येवू लागला. सकू म्हणायची, "असली कामं बरी नव्हं. तुमचा भाऊ आबा बगा, बाजारात जातू काय-बाय विकतो. पोरास्नी खाया-पिया आणतू अन तुम्ही काय करता. एक दिवस सगळं जाईल. तवा कळलं" गणा वैतागून जायचा.

एक दिवस आबाला म्हणाला, "सकू बग लई काय-बाय बोलतिया. बाजार करायला तुझ्या बरूबर ने. कांदा-बटाटा इकतू. चार पैसं येतील. तिला बी बरं वाटलं." आबानं मनावर घेतलं. गुरुवारी गणाला घेवून बारामतीचा बाजार गाठला. बाजार बघून गणा हरखून गेला. व्यापाऱ्याकडून कांदा-बटाटा घेतला. दिवसभर कसाबसा विकलं. चार पैसं मिळालं अन समद्या पैशाचं पोरास्नी खाया घेवून घरला आला. सकू वैतागून गेली. अव रखमाकडून पैसं घेतलं व्हतं. तुमच्या भांडवलाला. अन त्याचं तुम्ही खाया घेवून आला व्हय. काय वाटतं की नाय. रखमाचं पैसं कसं द्यायचं. सांध्याकाळच्या बोलीवर आणलं व्हतं" पण गणाचं लक्ष तिच्या बोलण्याकडं नव्हतं. तो ही पोरांबरोबर खाण्यावर तुटून पडला व्हता. सकूनं डोळ्याला हात लावला. आता 'असल्या नवऱ्याचं काय करावं' तिला समजेना.

सकूनं गणाला धारेवर धरलं गणाला काय बी सूचना. बाजार मात्र त्याला जाम आवडला. 'आता काय बी करून रखमाचं पैसं चुकतं करायचं. नाय तर सकू रातच्याला भाकर दयायची नाय." म्हणून तडक बाजार गाठला. बाजारातून काय तरी चोरायचा त्याचा बेत होता. ते इकून रखमाचं पैस दयायचं असे मनोमन ठरवलं व्हतं. चोऱ्या करण्यात कधी तसा पटाईत होता. हातचलाखी करून याचं काय उचल, त्याच काय उचल अन् कुणालं तरी विकलं पैसं मिळालं. सकूला दिलं 'आपला नवरा म्हणतू तितका येडा नायं' यावर तिचा विश्वास बसला पण नवरा बाजारात काय करतो तिला अजिबात माहिती नव्हतं.

शिमग्याचा सण जवळ आला होता. 'पोरास्नी नवं कापडं, बायकूला लगडं घ्यायचा ईचार गणानं केला. बाजारात आज मोठा डाव मारायचा. या इरादयाने गडी बाजारात दाखल झाला. सगळा बाजार पालथा घातला. आबानं त्याला हटाकलं, 'अरं नुसता फिरतूया, बाजार भरल आता. रामोशेठकडं जा. वांगी-बिंगी घे. मी सांगतू." पण गणानं काय ऐकलं नाय. तसाच पुढं निघून गेला.

बाजारात गर्दी वाढली. फळांची, भांडयाची, भाजीपाल्यांची, खेळण्यांची बाजारपेठ भरून गेली होती. गणा खेळण्याच्या बाजारात गेला. तिथचं बसला. खेळण्या घेवून आणखी एक गाडी आली. खाली करून निघून गेली. कोणी बी तिथं नव्हतं. गणानं हेरलं. त्यातलं एक गाठुडं उचललं अन तडक घरचा रस्ता धरला. एसटीच्या टप्प्यावर टाकून वाडीला आला. पण हे गठुडं वाडीला नेलं तर मोठी पंचाईत होवून बसलं. मालक शोधत आला तर? या विचारानं गणा घाबरून गेला. म्हणून रानातल्या खोपटात गठूडं ठेवून घरी आला. सकूला म्हणाला, 'आता बग शिमग्याला काय बी कमी पडणार नाय. तुला लुगडं, पोरास्नी कापडं घेतू उद्याच्या बाजारात.' यावर सकू म्हणाली, "पण येवढं पैसं हाईत का आपल्याकडं."

"अगं तू नुसतं बग म्या काय करतूचा" गणा म्हणाला. सकू विचार करत बसली. इकडं गणाच्या डोक्यावरचं गठुडं दामूनं पाहिलं व्हतं दामू तसा बेरकी गडी. कुणाच्या बी घरी कायबी होवू दे पाहिली बातमी दामूला कळायची. एक नंबरचा खबरी गडी. लगेच त्याने वाडीच्या समदया पोरांना गणानी खोपटात ठेवलेल्या गठुडयाबद्दल सांगितलं. सगळी पोरं गणाच्या खोपटाकडं पळाली. गठुडं सोडलं. त्यात खेळणींच खेळणी. गाडया काय, फुगे काय पिपाण्या काय, बरचं काय वाय व्हतं. सगळया पोरांनी लुटलं. सगळया वाडीत संध्याकाळी पिपाण्या वाजाय लागल्या. वाडी बऱ्याच दिवसातून गजबजून गेली.

समदी पोरं फिरायची - गणा बघायचा आपलं गठुडं रानात हाय आपल्याला काय करायचं कुणी बी पिपाण्या, वाजवाना पण पिपाण्या बघून गणाच्या पोरानं भोंगा पसरला, 'आई मला पिपाणी दे' म्हणून त्यानं घर डोक्यावर घेतलं. सकू ही वैतागली होती. नवऱ्यावर खेकसली, 'कापडं घेता म्हतूया. पहिलं पोराला पिपाणी घ्या. समदी वाडी पिपाणी वाजवतीया अन माझ्या पोराकडं नाय पहिली पिपाणी आणा माझ्या पोराला.' गणा तडक मळयात गेला. पाहतो तर काय आख्खं गठुडं गायब होतं. आता काय करायचं? वाडीच्या पोरानी मलाच हात दावला. बघतूच ऐका-ऐकाकडं म्हणून वाडीत आला. पण काय करायचं आपून बी कुणाला तरी हात दावला हाय चोरी केली हाय, बोभाटा झाला तर आपली चोरी उघड होईल. पोलिसात जावं तर कुठून आणलं म्हणून इचारत्याल. तर तुरूंगाची हवाच खावा लागेल. म्हणून तसाच इचारात घरात शिरला. 'पिपाणी! पिपाणी' म्हणून पोराच्या तोंडाला फेस आला होता. 'नुसतं बघताय काय आणा की पिपाणी पोराला' म्हणून बायको खेकसत होती. शेवटी गणानं रमाला गाठलं पैसं



TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI
Principal
Tuljaram Chaturchand College
Baramati

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 82 (A) : पटकथा लेखन : स्वरूप आणि चिकित्सा
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
January-2019

घेतलं. कोल्हाळयाला जावून पिपाणी आणली. पिपाणी पाहून पोरगं हसल. समदी वाडी पिपाणी फुकटात वाजवत व्हती अन गणाचं पोरगं इकतची पिपाणी वाजवत व्हतं. 'पिपाणी करां वाजवतय पोरगं' म्हणून सकू त्याच्याकडे बघत व्हती अनू गणा रक्माच्या पैशाच्या इचार करत बसला व्हता.

पटकथा

दृश्य क्र. १ :
ठिकाण : खेडे गाव पात्र : गावकरी
डोगरांच्या खुशीतले
वेळ : दिवस
डोंगरावरून गावाचं भव्य दर्शन.... सर्व गावावरून कॅमेरा ... गावात लोकांच्या हालचाली .... जनावरे इडइन ..... तिकडे नेहताना लोकं दिसतायेत. गाण तस दुष्काळीचं.

दृश्य क्र. २ : (In)
ठिकाण : घर पात्र : गणा - सखू - लहान २ मुल
वेळ : दिवस
सखू : (रागात घरात इकडून - तिकडे भांडी आपटत) देवानं दोन सोन्यासारखी पोरं दिल्यात ...
नुसत बसून राहता कुठ काम बिम बगां की .....
गणा : (जेवत असतो....) एक घास तोडांत घालत ... मिरगाचा पावूस झाल्याबिगार काम नाय ...
कुठं जाऊ ...
सखू : कुठ बी जावा ..... काय बी करा ...... पण कामधंदा बगा .........

दृश्य क्र. ३ : (Out)
ठिकाण : पाटलांचे घर पात्र : गणा, पाटील व पाटलीन बाई
वेळ : दिवस
गणा : (पाटलाच्या वाडयासमोर जात......) पाटलीन बाई .... ओ पाटलीन बाई .....
पाटलीण बाई : (हातातील गवत वासराखाली टाकत) .... कोण गणा .... आहे बोल की गणा .....
गणा : पाटील आहेत का घरी (तेवढयात पाटील दरवाज्यातून बाहेर येतात....)
पाटील : काय रे गणा..... लय सकाळ-सकाळ आला आज धरला.... काय काम काढलं....
गणा : अवं पाटील जरा कामधंदा मिळेल का? पैसा - आडका नाय अजिबात खर्चायला.
पाटील : ये मग आजपासुन माझ्या खोगराच्या मळयात कामाला .......
बर गणा येतो ..... जरा गरबडीत हाय मी .......

दृश्य क्र. ४ :
ठिकाण : रान पात्र : गणा, पाटील व कामगार
वेळ : दिवस
(गणा घाम पुसत-पुसत हातातील घडाळयाकडे पाहतो तर दुपारच्या दोन वाजून गेल्या असतात... गणा सर्व कामगारांना म्हणतो....)
गणा : आरं चला जेवायला..... दुपारच्या दोन वाजुन गेले पार .... पोटात कावळे ओरडायला लागले पार माझ्या
(सर्व जन जाऊन जेवायला बसतात ... तेवढयात)
पाटील : झाले का गडयांनो जेवन
गडी : अरे पाटील आले ...... अहो पाटील या जेवन करायला .....
पाटील : जेवा ....... जेवा...... निवांत जेवा ........
पाटील : आरं पोरांनो दुष्काळ पडलाय.... त्यामुळ पैसा आडका संपलाय आता .... त्यामुळे

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI
Principal
Tuljaram Chaturchand College
Baramati

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 82 (A) : पटकथा लेखन : स्वरूप आणि चिकित्सा
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
January-2019

उद्यापासून मी काम बंद करावं म्हणतोय.

(गणाने हातातील घास खाली ठेवला व आश्चर्यचकित होवून सर्वांकडे पाहिले...)

दृश्य क्र. ५ :

ठिकाण : घर पात्र : गणा व सखू

वेळ : संध्याकाळ

गणाने विचार केला की आता सखू लय काय बाय बोलायला लागलीया आता आपण कुणाच्या तरी रानात जाऊन चोरी करायची .... अनं मिळालेली वस्तू बाजारात जाऊन विकायची.... या उद्देशाने तो घराबाहेर पडला.

दृश्य क्र. ६ :

ठिकाण : शेत पात्र : गणा

वेळ : रात्र

गणा एका माणसाच्या रानात जाऊन पोहचतो.... रानात पडलेली ..... जी मिळेल ती वस्तू उचलतो व घरी घेवून येतो.......

दृश्य क्र. ७ :

ठिकाण : घर पात्र : गणा, सखू व मुलं

वेळ : रात्र

(गणा चोरी केलेले गठुडे डोक्यावर घेवून घरामध्ये प्रवेश करतो.. सखू स्वयंपाक करत होती)

गणा : आई.... आई.... गं..... खुप वझं झालं.... लय जड.

सखू : केली.... ना.. परत .... चोरी... तुम्हाला किती वेळा सांगीतलं असली कामे वरी नव्ह.

गणा : मग मी तरी काय करू.... कुठं काम नाय .... धंदा नाय.... पोटाची खळगी भरायला लागतच की .....

सखू : अवं.... तुमचा भाऊ आबा... बघा... बाजारात जातू... काय-बाय विकतू... बायका पोरान्सी खाया-पिया आणतो... अन तुम्ही काय करता... एक दिवस सगळ जाईल... तवा कळेल तुम्हाला... खावा अन झोपा आता .....

RESEARCHJOURNEY

दृश्य क्र. ८ :

ठिकाण : गणाच घर पात्र : गणा, सखू व मुलं

वेळ : सकाळ

(गणा सकाळ-सकाळ घराबाहेर पडतो... व सखूला म्हणतो...)

गणा : आज काही तरी काम धंदाच पाहतो.... मोकळा येतच नाही माघारी......

सखू : थांबा (गणाचा हात धरून त्याच्या हातावर पैशे ठेवते) ... व्हत्यानं वांगी-बटाटी घ्यायला... अन.... आबा सोबत जावा ... बारामतीच्या बाजारात कांदा-वांगी विका ... चार पैसे येतील... सुख्या दानी काम काय.

(गणा तिच सर्व ऐकुन घेवून पुढे रस्त्याला लागतो)

दृश्य क्र. ९ : (Out)

ठिकाण : आबाच घर पात्र : आबा व गणा

वेळ : सकाळ

(आबा सकाळ-सकाळ बाजाराला जायच्या तयारीत असतो... तो आपले गठुडं गाडीवर बांधत असतो... तेवढ्यात)

गणा : आबा.... आर ये... आबा... चालला काय बाजारला.

आबा : अरे ये गणा.... हो चाललू बाजाराला....

गणा : आर... आबा... सखू... लय... काय-बाय बोलती... या आज मला तुझ्या सोबत बाजारला घेवून चल... थोडे फार विकतो.... म्हणजे चार पैसे येतील... म्हणजे सखुला ही

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI
Principal
Tuljaram Chaturchand College
Baramati

बरं वाटलं.

(आबानेही मनावर घेतलं आणि म्हणाला)

आबा : बर चल... बाजारला.... धर गठुडं अन बस माझ्या मागं गाडीवर....

(गाडी धुराळा उडवित निघून जाते)

दृश्य क्र. १० :

ठिकाण : बाजार पात्र : आबा, गणा, रामाशेठ, बाजारातील गर्दी

वेळ : दिवस

(दोघे ही बाजारात रामाशेठच्या दुकानाच्या बाजुकडे चालायला लागतात.)

रामाशेठ : काय घ्यायचं बाई... सगळा माल आज स्वस्त हाय. काय देवू बोला.

बाई : वांगी दया एक किलो.

(रामाशेठ वांग्याचे वजन करत असतानाच गणा व आबा येतात तेवढयात....)

रामाशेठ : आबासाहेब या...या...या... दुकान वाढवलं वाटत... दुसरा गडी आणलाय.

आबा : तस काही नाही... शेठ ... हा माझा धाकटा भाऊ... याला... दुकान लावायचय आज पासुन... मंडईत तवा याला माल पाहिजे...

रामाशेठ : माल... आर आबा मी तुला कधी नकू म्हणतुया का... किती वी माल ने अन वेळेवर पैसे आणुन दे .... म्हणजे झालं....

आबा : गणा घे माल तुला कुठला पाहिजे तो.....

(काही वेळातच गणाने दुकान थाटलं अन माल जोर-जोराने ओरडून विकू लागला... संध्याकाळ झाली... माल संपत आला होता... पोत्याखाली ठेवलेले पैसे तो सतत पाहत होता... त्याला ते पैसे पाहून खूप आनंद वाटत होता... की त्याने खूप दिवसातून इतके पैसे मिळवले होते. माल संपला की तो तडख उठला आलेल्या सर्व पैशाचे त्याने पोरांना व बायकोला खायला घेतल. व तो सरळ बारामती एस.टी. स्टन्डला गेला व एस.टी.त बसून गावाकडे आला)

RESEARCHJOURNEY

दृश्य क्र. ११ : (Out - In)

ठिकाण : गणाचं घर पात्र : गणा, सखु व मुलं

वेळ : दिवस मावळलाय गेलाय.

(दोन लहान मुल व सखू दारात उभी आहेत... त्यांना गणा डोक्यावर गठुंड घेवून येताना दिसतोय... मुल तात्या ... आल... तात्या आलं... म्हणून उडया मारतायेत)

गणा : लांबूनच... ये राम्या... ये तुला खायला देतो.

सखू : (चेहऱ्यावर मंद हास्य) .... ये, राम्या जा लवकर... (आणि ती राम्याला गणाकडे पाठवते.)

(सर्वजन घरात जातात.... गणानं सर्व पैशाचं खायला आणलं होतं... अन मुल खाऊवर ताव मारायला लागली होती. पैसं शिल्लक राहिले नाहीत हे पाहून सखु तर जाम वैतागली होती)

सखू : रकमाकडून पैसे घेतले होते तुमच्या भांडवलाला अनं त्याच खाया घेवून आला व्हयं.... काय... वाटत का नाय मनाला.... आता रकमाचं पैशे कसे द्यायचे.... संध्याकाळच्या बोलीवर आणले व्हतं.

(पण गणाचं लक्ष तिच्या बोलण्याकडे नव्हतं तो ही पोरासोबत खायला तुटून पडला होता.)

सखू : असल्या नवऱ्याच काय कराव... असं म्हणत डोक्याला हात लावून खाली बसली....

दृश्य क्र. १२ : (In)

ठिकाण : घर पात्र : गणा, सखु व मुलं

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI
Principal
Tuljaram Chaturchand College
Baramati

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 82 (A) : पटकथा लेखन : स्वरूप आणि चिकित्सा
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
January-2019

वेळ : रात्र

(सर्वजन झोपलेत.. झोपल्या-झोपल्या सखू गणाला म्हणाली.....)

सखू : तुम्हाला.... माझे पैसे माघारी दिल्याबगर सुटटी नाय.... मी रकमाबाईच आज सानच्याच्या वायदयावर पैसे आणले होते... तवा मला उद्या सकाळ माझ पैसं पाहिजेत... सकाळ परत सांगीतलं नाय म्हणचान....

गणा : गणा बिचारा गप्प बसला व रकमाबाईच पैसं कस दयायचं याचा विचार तो करू लागला...
व विचार करत-करत तो झोपी गेला....

दृश्य क्र. १३ : (In-Out)

ठिकाण : गणाचं घर पात्र : गणा, सखु व मुलं

वेळ : सकाळ-सकाळं

(गणा सकाळ-सकाळ... सखू व मूलं उठण्या अगोदर घराबाहेर पडला व तडख बारामतीचा बाजार गाठायचा या हिशोबाने तो निघाला व सकाळचाच तो मार्केट यार्डात तो लिलावाला पोहचला... आणि काहीतरी चोरायचं... हा निर्णय करूनच तो गर्दीत घुसला....

त्या गर्दीत त्याने एक गाठुडं उचललं व तेथेच एका व्यापाऱ्याला विकलं..... त्यातून आलेलं पैसे तो घेऊन तो सरळ घराकडे परतला आणि घरी आल्या-आल्या ... सखूच्या हातावर पैसे ठेवले.. सखूला खूप धन्य वाटले.....)

सखू : (मनातल्या मनात...) आपला नवरा इतका येडा नाय... यावर सखूचा विश्वास बसला. तो पैसे कमवतो... थोडं थांबुन....

सखू : अवं आता शिमग्याचा सण जवळ आलाय पोरान्सी कापडं मला नव लुगडं घ्या....
की असेच काम करून.....
(गणाने मनाशी ठरवलं की आजच बाजारात जाऊन मोठा डाव मारायचा व शिमग्याला
कापडंच आणायची... या इरादयाने गडी घरून लगेच निघाला.....)

दृश्य क्र. १४ :

ठिकाण : बाजार पात्र : गणा, आबा व बाजारातील गर्दी

वेळ : दुपार

RESEARCH JOURNEY

(गणाने सगळा बाजार पालथा घातला पण कुठ डाव मारायला चान्स काय मिळेना... तो खुप फिरला... तेवढ्यात आबाने त्याला हटकले.....)

आबा : अरं गण्या नुसत्या फिरतुया... बाजार भरल आता... रामाशेठ कडं जा... वांगी-बिंगी घी मी
सांगतू रामाशेठ ला...

(पण गणानं काय ऐकलं नाय. तो तसचा पुढं निघून गेला,

आता बाजारातील गर्दी वाढली, फळांची, भाजी पाल्यांची, खेळण्याची, बाजारपेठ भरून गेली होती... गणा खेळण्याच्या पेटेत गेला. तो तिथेच बसला... खेळणी घेवून एक गाडी आली व खाली करून निघून गेली. तिथ कोणी नाही.... हे गणाने हेरल व त्यातल एक गठुंड उचललं. .. अनं तडख घरचा रस्ता धरला.. एस.टीच्या टप्पावर टाकून तो वाडीकडे आला)

दृश्य क्र. १५ :

ठिकाण : रानातील खोपाट पात्र : गणा

वेळ : संध्याकाळ

गणाने विचार केला की हे गठुडं वाडीला नेल तर मोठी पंचाईत होवून बसल. मालक शोधत आला तर? या विचारानं गणा घाबरून गेला. म्हणून त्यांचे त्याच्या शेजारच्या रानातल्या खोपटात गठुडं ठेवून घराकडे निघाला.

दृश्य क्र. १६ (In) :

ठिकाण : घर पात्र : गणा, सखू व मुलं

वेळ : दिवस

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI
Principal
Tuljaram Chaturchand College
Baramati

(गणा धापाधूम अवस्थेत घरामध्ये शिरतो.)

सखू : अवं..... न जेवताच कुठं गेला होता. माघारी का.... येलता..... का घेतलेला माल-बिलं विकायचा राहिला होता काय?

गणा : आता बघ शिमग्याला.... काय बी कमी पडणार नाय.... तुला लुगडं पोरास्नी कापडं घेऊ उद्याच्या बाजारात.

सखू : पण एवढे पैसे हाईत का आपल्या कडं.

गणा : अंग तू नूसतं बग म्या काय करतुया... ते

(यावर सखू नुसती विचार करत बसली)

गणा : ये वाढ लवकर जेवायला .... जेवून जरा आराम करतो.

सखू : आराम

गणा : अग.... म्हणजेच झोपतो गं... (असं म्हणत त्याने खाटेवर उडी मारली)

**दृश्य क्र. १७ (In-Out) :**

ठिकाण : रानातील खोपाट पात्र : दामू व गावातील लहान मूलं

वेळ : सकाळ

(गणाने ठेवलेले गठुडे दाम्याने पाहिले होते. नंतर दाम्या गावातील लहान मुलांना घेवून गण्याच्या खोपटावर जातो अन.....)

मुलगा : दामू अण्णा आम्हाला कशाला आणलय इथ गण्याच्या कोपटात....

दाम्या : आर इथ आज लय मोठा खजिना हाय.... सोडा ते आतील गाठुडं...

(क्षणातच मुलं जोरात गठुडयांच्या दिशेने पळाली... गठुड सोडून पाहिल तर आत खेळणीच खेळणी.... फुगे काय? पिपाण्या काय? गाडया काय.... बरच काय... काय.... होतं....

सगळया पोरांनी ते लुटलं..... व वाडीच्या दिशेने पिपाण्या वाजवित पळाली......)

**दृश्य क्र. १८ (In-Out) :**

ठिकाण : गांव पात्र : गणा, सखु, मुलं व गावातील बरीच पोरं

वेळ : सकाळ

(गणा दचकुन उठला... पाहतो तर काय समदया गावात फक्त पिपाणीचाच आवाज.... नंतर तो बाहेर आला... तर प्रत्येक मुलाच्या हातात पिपाणी आणि ते खुप-खुप जोर-जोरात वाजत होते)

गणा (स्वतःशी): आपल गठुंड रानात हाय.... आपल्याला काय करायचयं.... कुणी बी पिपाण्या वाजवाना...

(पिपाण्या बघून गण्याच्या पोरांनी भोंगा पसरला)

मुलगा : आई मला पिपणी दे.... आई मला पिपाणी दे.

(अस म्हणत त्यांनी खुप आवाज करायला सुरवात केली.) (सखु वैतागली अन बोलली)

सखू : कापड घेता म्हणताया पहिलं पोराला पिपाणी दया समदी वाडी पिपाणी वाजवतिया... अन माझ्या पोराला नाय.... पहिली पिपाणी आना... माझ्या पोरांना.

(गणा उठला अन तडख मळयाच्या वाटेने निघाला)

**दृश्य क्र. १९ (In-Out) :**

ठिकाण : खोपाट पात्र : गणा

वेळ : दिवस

(गणा खोपटात जाऊन पाहतो तर काय समद गठुडं गायब होत... आता काय करायचं? वाडीच्या पोरानी... मला फासवलं... बघतुच ऐक-ऐकाकडे अस म्हणून माघारी फिरला

रस्त्यात चालता-चालता विचार करू लागला, की आपली चोरी उघड होईल..... पोलीसात जाव लागेलं. एखाद्या वेळेस तुरूंगाची हवा ही खावी लागेल. अशा विचारातच तो घरात शिरला.)

BARAMATI TULJARAM CHATURCHAND COLLEGE
Principal
Tuljaram Chaturchand College
Baramati

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 82 (A) : पटकथा लेखन : स्वरूप आणि चिकित्सा
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
January-2019

सिन क्र. २० (In) :
ठिकाण : घरं पात्र : सखु, मुल व शेजारीण
वेळ : दिवस
(पोरगं पिपाणीसाठी ओरडतय ... रडतय... तेवढयात)
शेजारीन : अगं सखे दी की पोराला पिपाणी... इतकं रडताय अन काय गं तु बी... दी पिपाणी...
सखू : रडू नगू पोरा.... तुमचा बाप गेलाय पिपाणी आणायला... येईल आता....
(तेवढयात गणा घरात शिरला...)
सखू : आला तुमचा बाप.... ये दया की पिपाण्या पोराला...
(पिपाणी-पिपाणी म्हणून पोरांच्या तोंडाला फेस आला होता.)
सखू : नुसत बघताय काय? आणा की पिपाणी पोराला.... (अस म्हणत ती उठते)
(गणा सखुला काही न बोलता..... घराबाहेर पडला.... व रस्त्याने निघून गेला.....)

दृश्य क्र. २१ (Out) :
ठिकाण : रक्माचं घरं पात्र : गणा व रक्माबाई
वेळ : दिवस
गणा : अग ये रक्माबाई....
रकमाबाई: काय रं गण्या.....
गणा :मला थोडं पैसे दे.... मी उदया बाजारावरून आल्यावर (तेवढयात एका पोरगं त्याच्या पुढून पिपाणी वाजवत पळत जाते) ... ये पोरा... कुणाचं र पिळगं हाय हे.... तर मी काय म्हणतुया रकमाबाई... मला थोडे पैसे दे उदया देतो तुझे.

(गणाने रकमाकडून पैसे घेवून सायकल वरून थेट कोन्हाळे गाठले आणि पिपणी आणुन पोराला दिली. पोरं जोर जोरात पिपाणी वाजवाय लागला.... अन सकु पोरांकडे व गणाकडे पाहून मंद हास्य करत होती. पन गणा डोक्याला हात लावून विचार करत असतो समदी पोरं फुकटची पिपाणी वाजवत्यात अन माझ पोरगं इकतची पिपाणी वाजवतय. रक्माच्या पैशचं काय करायच? कस द्यायचं? सखूला कळल तर काय करायचं?)

## समारोप :

वरील प्रमाणे कथेचे पटकथेमध्ये रूपांतर करीत असताना मूळ कथेत काही बदल करावा लागतो. एक दृश्य दुसऱ्या दृश्याला जोडून चित्रिकरण केले तर एक सलग चित्रपट तयार होतो. दृश्यांचे चित्रिकरण करीत असताना कॅमेऱ्याला महत्त्व असते. प्रसंगानुरूप समिपदृश्य, दूरदृश्य, अतिदूरदृश्य असा कॅमेऱ्याचा कोन घ्यावा लागतो.

## संदर्भ ग्रंथ :

१) 'गणाची पिपाणी' - डॉ. सुनील खामगळ
२) साहित्यकृतीचे माध्यमांतर - संपादक डॉ. राजेंद्र थोरात, प्रा. अशुतोष कसबेकर
३) www.google.com

---------------

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI
Principal
Tuljaram Chaturchand College
Baramati